**नगर परिषद/नगर पंचायत निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-मनप-२००४/प्र.क्र.३८ /का-०६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ६ डिसेंबर, २००४.

## आ दे श

महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायती निवडणूक नियम, १९६६ मधील नियम ६४ यामधील तरतुदींनसार निवडणुकांसाठी होणारा खर्च नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या निधीतून करणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. हैद्राबाद या भारत सरकारच्या अंगीकृत व्यवसायाच्या सहकार्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र विकसित केले आहे. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा काही पोटनिवडणुकीमध्ये यशस्वीरित्या वापर करण्यात आला आहे. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये आवश्यकतेनुसार उमेदवार निवडण्याची सोय आहे, म्हणजे नगर परिषदांमधून नगरसेवक व नगराध्यक्ष यांच्यासाठी एकत्रितपणे मतदान करावयाचे असते, ते मतदान या यंत्रात करण्याची सोय आहे. परंतु निकाल वेगवेगळे पाहता येतात. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे यामध्ये वेगळी काढता येणारी मेमरी बसविलेली आहे. त्यामुळे निकाल लागल्यानंतर यंत्र पूर्ण सील करण्याची आवश्यकता राहात नाही. यंत्रामधील वेगळी काढता येणारी मेमरी काढून ती सील करुन कोषागारात ठेवता येते व निवडणूक याचिका झाल्यास ही मेमरी कोणत्याही मतदान यंत्रात बसवून त्यामधील निकाल पाहता येतो. या यंत्राची किंमत रुपये १०,५००/- आहे. वेगळी काढता येणा-या मेमरीमुळे मतदान यंत्रे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कमी प्रमाणात लागतील.

निवडणूक प्रक्रिया अधिक गतिमान व्हावी, निकालावरील वेळ वाचावा व खर्चही वाचावा यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर निवडणुकीत करणे गरजेचे आहे. तसेच विधानसभा व लोकसभा निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सरसकट सुरु झाल्याने महाराष्ट्रातील मतदारांकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सुरु करण्याची मागणी करण्यात येत आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र खरेदी करण्यावरील सुरुवातीस खर्च फार जास्त वाटत असला तरी २ निवडणुकांमध्ये संपूर्ण खर्चाची वसुली होऊ शकते.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेतल्याने मतपत्रिकांची छपाई व मतमोजणीवर होणारा खर्च अतिशय कमी होईल, मतमोजणीच्यावेळी मतमोजणी कर्मचा-यांच्या जेवणाची सोय करायला लागते, मतमोजणीसाठी मोठा हॉल किंवा मंडपाची सोय करायला लागते, त्या खर्चात देखील बचत होईल.

राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद मुख्याधिका-यांच्या विभागीय पातळीवर बैठका आयोजित केल्या होत्या. त्या बैठकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेण्याच्या विषयावर चर्चा झाली. या चर्चेमध्ये सर्व मुख्याधिका-यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेण्यासाठी नगर परिषदांकडून अंशदान देण्यास सहमती दर्शविली. नाशिक येथील विभागीय बैठकीत मतदान यंत्रे घेण्यापोटी किती प्रमाणात अंशदान घेण्यात यावे, यावरही चर्चा झाली. त्या बैठकीत नाशिक विभागातील मुख्याधिका-यांनी बहुतांशी रुपये ७/- प्रति मतदार एवढे अंशदान घेण्यात यावे, असे सांगितले.

मतदान यंत्रे घेताना प्रत्येक नगर परिषद व नगर पंचायती यांच्यावर जास्त बोजा पडू नये, अशीही राज्य निवडणूक आयोगाची इच्छा आहे. त्यामुळे प्रत्येक नगर परिषद व नगर पंचायत यांनी त्यांच्या क्षेत्रातील मतदारांची संख्या विचारात घेऊन रुपये ५/- प्रति मतदार याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी अंशदान दयावयाचे आहे. प्रति मतदार रुपये ५/- याप्रमाणे प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी येणारी रक्कम धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन, मुंबई यांच्या नांवाने पाठविण्यात यावी. हा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) दिनांक- १५ जानेवारी, २००५ पर्यंत प्राप्त होईल, अशा बेताने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा.

**( नन्द लाल )**
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

प्रतः-

१) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
३) सर्व विभागीय आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) सर्व नगर परिषद/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी